IIMR Bulletin No. 12/2014-15/TSP-Extn.



# खरीप ज्वारी लागवडीचे सुधारीत तंत्रज्ञान

रा.रा. चापके, वि.रु. भागवत,
सु.श्री. गोमाशे, ज.वि. पाटील

भाकृअनुप
ICAR

IIMR






**प्रकाशक**

**डॉ.ज.वि. पाटील**

संचालक,

भाकृ अनुप - भारतीय भरडधान्य संशोधन संस्था

राजेंद्रनगर, हैद्राबाद ५०००३०, (तेलंगाना)

दुरध्वनी : ०४०-२४५९९३०१

फॅक्स : ०४०-२४५९९३०४

वेबसाईट : www.millets.res.in

❖ ज्वारी हे कमीत कमी निविष्ठांसह, वेगवेगळ्या परिस्थितीत, सर्व हंगामात घेता येणारे पिक आहे. सद्यपरिस्थितीत तुरळक व कमी पर्जन्यमान असणाऱ्या, तामिळनाडु ते उत्तरांचल पर्यंत अनेक राज्यांमध्ये ज्वारीचे पिक, धान्य व कडबा मिळविण्यासाठी पेरले जाते.

❖ भारतामाध्ये, खरीप ज्वारीचे क्षेत्रफळ २८.९२ लक्ष हेक्टर तर रबी ज्वारीचे क्षेत्रफळ ४६.३९ लक्ष हेक्टर एवढे आहे, ज्वारीचे पिक मुख्यतः महाराष्ट्र (५४%), कर्नाटक (१८%), राजस्थान (८%), मध्य प्रदेश (६%) आणि तेलंगाना (४%) मध्ये विविध भौगोलिक परिस्थितीत घेतले जाते.

❖ जरी ज्वारीच्या क्षेत्रफळामध्ये मागील चाळीस वर्षांमध्ये लाक्षणिक घट झाली असली तरी प्रति हेक्टरी उत्पादकतेमध्ये वृद्धी (७० ते ८७%) झालेली आहे, राष्ट्रीय ज्वार संशोधन संचालनालय व अखिल भारतीय समन्वयित ज्वारी सुधार प्रकल्प यांनी संशोधीत केलेल्या हंगाम-निहाय व अधिक उत्पादन क्षमता असलेल्या सुधारीत व संकरीत वाणांमुळे तसेच सुधारीत लागवड तंत्रज्ञानामुळे उत्पादकतेमध्ये इतकी वाढ शक्य झाली आहे.






❖ इतर पिकांसोबतच ज्वारीची स्पर्धात्मक क्षमता नविनतम पिक लागवडीच्या माध्यमातून वाढविणे, आंतर पिके व क्रमिक पिकं घेणे, कमी खर्चात लागवड करणे व विविध पौष्टिक खाद्यपदार्थ तयार करून मूल्यवर्धन करणे हे अतिशय गरजेचे आहे.

## खरीप ज्वारीचे सुधारीत तंत्रज्ञान

खरीप हंगामात लागवडीकरीता शिफारस केलेले जास्त उत्पादन क्षमता असणारे ज्वारीचे वाण

| संकरीत वाण | सुधारीत वाण | लागवड क्षेत्र |
|---|---|---|
| सी.एस.एच. -१४ | सी.एस.व्ही - १४ | कमी पावसाचा प्रदेश |
| सी.एस.एच. -१६<br>सी.एस.एच. -१८<br>सी.एस.एच. -२१<br>सी.एस.एच. -२३ | एस.पी.ही - ४६२<br>सी.एस.व्ही - २३<br>सी.एस.व्ही - २०<br>सी.एस.व्ही - १५ | सामान्य पावसाचा प्रदेश |
| सी.एस.एच. -१४ | एन.टी.जे. १ व २ | खरीपातील उशिरा पेरणीचा प्रदेश |
| सी.एस.एच. -१४ | सी.एस.व्ही - १७ | हलक्या जमिनीचा प्रदेश |
| सी.एस.एच. -१६ | एस.पी.व्ही - ४६२ | मध्यम ते भारी जमिनीचा प्रदेश |
| सी.एस.एच. १८<br>सी.एस.एच. -२३<br>सी.एस.एच. -२५<br>सी.एस.एच. - ३० | सी.एस.व्ही - १५<br>सी.एस.व्ही - २०<br>सी.एस.व्ही. - २३<br>सी.एस.व्ही. - २७ | |


खरीप ज्वारी

## खरीप लागवडीकरीता शिफारस केलेल्या जास्त उत्पादन क्षमता असणाऱ्या ज्वारीच्या संकरीत व सुधारीत वाणांची ठळक वैशिष्टे

### अनुकुल संकरीत वाण




| | | |
|---|---|---|
| **१. संकरीत वाण** | : | **सी.एस.एच. - १४** |
| धान्य उत्पादन (क्वि / एकर) | : | १५.२० |
| कडबा उत्पादन (क्वि / एकर) | : | ३५.२० |
| झाडाची उंची (से.मी.) | : | १८१ |
| पिकाचा कालावधी (दिवस) | : | १०२ |

**ठळक वैशिष्ट्ये :** मध्यम उंची, लवकर परिपक्वता, मध्यम सैल कणीस, जाड दाणा, दाण्यावरील बुरशी व पानावरील ठिपक्याच्या रोगास प्रतिकारक, कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशाकरीता आणि आंतर पिकाकरीता योग्य वाण.




| | | |
|---|---|---|
| **२. संकरीत वाण** | : | **सी.एस.एच. - १६** |
| धान्य उत्पादन (क्वि / एकर) | : | १६.८० |
| कडबा उत्पादन (क्वि / एकर) | : | ३६.४० |
| झाडाची उंची (से.मी.) | : | २१० |
| पिकाचा कालावधी (दिवस) | : | ११० |

**ठळक वैशिष्ट्ये :** मध्यम उंची, लाबंट, सैल व वरच्या बाजूस मोकळे कणीस, मध्यम जाड दाणा, दाण्यावरील बुरशी व पानावरील रोगास प्रतिकारक, गोल व मोत्यासारखा चमकदार दाणा, भाकरी बनवण्यासाठी अतिशय चांगली, कडबा पचणासाठी हलका आणि मोठ्या प्रमाणात पोषक असतो.

**३. संकरीत वाण : सी.एस.एच-१८**

| | | |
|---|---|---|
| धान्य उत्पादन (क्वि / एकर) | : | १६.४० |
| कडबा उत्पादन (क्वि / एकर) | : | ५२.४० |
| झाडाची उंची (से.मी.) | : | २१२ |
| पिकाचा कालावधी (दिवस) | : | ११२ |




**ठळक वैशिष्ट्ये :** उंच, मध्यशीर फिकट हिरवी, जाड आणि रसाळ खोड, मुळांच्याजवळ जांभळा रंग दाणे मोत्यासारखे चमकदार व मध्यम आकाराचे, मध्यम परिपक्वता, दाण्यावरील बुरशीकरीता प्रतिकारक्षम असलेले वाण.

**४. संकरीत वाण : सी.एस.एच. -२३**

| | | |
|---|---|---|
| धान्य उत्पादन (क्वि / एकर) | : | १६.४० |
| कडबा उत्पादन (क्वि / एकर) | : | ३४.८० |
| झाडाची उंची (से.मी.) | : | १७८ |
| पिकाचा कालावधी (दिवस) | : | १०३ |




**ठळक वैशिष्ट्ये :** उंच संकरीत वाण, पांढरा दाणा,मध्यम भरीव व लवकर परिपक्वतेमुळे शेवटी येणाऱ्या दुष्काळजन्य परिस्थितीपासून बचाव होतो.

**५. संकरीत वाण : सी.एस.एच. - २५**

| | | |
|---|---|---|
| धान्य उत्पादन (क्वि / एकर) | : | १८.०० |
| कडबा उत्पादन (क्वि / एकर) | : | ३६.५० |
| झाडाची उंची (से.मी.) | : | २०५ |
| पिकाचा कालावधी (दिवस) | : | ११० |



**ठळक वैशिष्ट्ये :** मध्यम उंची, लांब व अर्धसैल कणीस, मध्यम जाड दाणा, मावा व दाण्यावरील बुरशी रोगास प्रतिकारक, सर्वात जास्त दाणे व कडब्याचे उत्पन्न देणारे संकरीत वाण.

# सुधारीत खरीप ज्वारी वाण

**६. जात : सी.एस.व्ही. - १५**

धान्य उत्पादन (क्वि / एकर) : १४.४०
कडबा उत्पादन (क्वि / एकर) : ४८.४०
झाडाची उंची (से.मी.) : २३२
पिकाचा कालावधी (दिवस) : १०७-११२

**ठळक वैशिष्ट्ये :** उंच वाढणारी, धान्य व कडबा दोन्हीकरीता, खोड चवदार, मध्यम आकाराचा गोल दाणा, मोठे लांबट मध्यापर्यंत घट्ट व वर मोकळे होत जाणारे कणीस, पानावरील ठिपक्यांच्या रोगास प्रतिकारक्षम, खोडमाशी व खोडकिडयांस सहनशील, उत्तर-पश्चिम अशा दोन्ही हेतूंकरीता शिफारस केलेले वाण




**७. जात : सी.एस.व्ही. -१७**

धान्य उत्पादन (क्वि / एकर) : १०.००
कडबा उत्पादन (क्वि / एकर) : २७.२०
झाडाची उंची (से.मी.) : १३६
पिकाचा कालावधी (दिवस) : ९७

**ठळक वैशिष्ट्ये :** गर्द हिरवी पाने असणारे, कमी उंचीचे व लवकर परिपक्व होणारे, मध्यम दाणे असलेले, पानावरील ठिपके व किडीस सहनशील असलेले वाण




**८. जात : सी.एस.व्ही. -२०**

धान्य उत्पादन (क्वि / एकर) : १३.६०
कडबा उत्पादन (क्वि / एकर) : ५७.६०
झाडाची उंची (से.मी.) : २३३
पिकाचा कालावधी (दिवस) : १०९

**ठळक वैशिष्ट्ये :** उंच, धान्य व कडबा दोन्हीकरीता उपयोगी, मध्यम आकाराचा गोल दाणा, साधारण सैल व मोठे कणीस असलेले वाण



| | | |
|---|---|---|
| **९. जात** | : | **सी.एस.व्ही. -२३** |
| धान्य उत्पादन (क्वि. / एकर) | : | १२.०० |
| कडबा उत्पादन (क्वि. / एकर) | : | ६४.०० |
| झाडाची उंची (से.मी.) | : | २४२ |
| पिकाचा कालावधी (दिवस) | : | ११५ |




**ठळक वैशिष्ट्ये :** उंच, धान्य व कडबा दोन्हीकरीता पांढरा दाणा, खोड माशी व खोड किडीस सहनशिल असलेले वाण

| | | |
|---|---|---|
| **१०. जात** | : | **सी.एस.व्ही. -२७** |
| धान्य उत्पादन (क्वि. / एकर) | : | १२.०० |
| कडबा उत्पादन (क्वि. / एकर) | : | ७७.०० |
| झाडाची उंची (से.मी.) | : | २४० |
| पिकाचा कालावधी (दिवस) | : | ११६ |




**ठळक वैशिष्ट्ये :** धान्य व कडबा दोन्ही करीता व सी एस व्ही -२३ पेक्षा उत्पादनात सरस, दाण्यावरील बुरशी रोगास व खोड किडीस प्रतिकारक.

# खरीप ज्वारीची सुधारीत लागवड पद्धती व पिक नियोजन

## जमीनीची पूर्व मशागत

❖ उन्हाळ्यामध्ये (एप्रील-मे) एकदा देशी नांगराने नांगरणी व २ ते ३ वेळा वखरणी करावी की जेणे करून जमिन भुसभुशीत होऊन जास्त पाणी मुरण्यास मदत होईल.

❖ पेरणीपूर्वी जमिनीमध्ये ४-५ टन प्रति एकर शेणखत / कंपोस्ट व ४ ते ५ किलो फ्युरॉडॉन ३जी दाणेदार किटकनाशक मिसळावे.



शेतीची नांगरणी

## पेरणीची वेळ

❖ पावसाळा सुरु झाल्यानंतर दोन आठवड्यांच्या आत किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्या अगोदर संपवायला हवी.




ज्वारी बिज प्रक्रिया

## बियाण्याचे प्रमाण

❖ सात ते आठ किलो प्रति हेक्टरी (३ ते ४ किलो प्रति एकर)

## झाडांमधील अंतर

❖ पेरणी दोन ओळीत ४५ सें.मी व दोन झाडांमधील १२ ते १५ सें.मी. अंतरानी करावी

❖ सर्व साधारणतः प्रति हेक्टर क्षेत्रात झाडांची संख्या १,८०,००० असायला हवी.

## बिजप्रक्रिया

❖ प्रति किलो बियाण्यास १४ मीली इमीडाक्लोप्रीड + २ ग्रॅम कार्बेनडाझीम (बावीस्टीन) ची बिजप्रक्रिया करावी किंवा थायमेथॅक्झाम ३.० ग्रॅम प्रति किलो बीयाण्याला वापरावे

❖ ॲझोटोबैक्टर या जैविक उर्वरकाचा वापर २५ ग्राम प्रति किलो बीयाणे या प्रमाणात करावा.

## रासायनिक खतांचा वापर

### १) हलकी जमीन व कमी पर्जन्यमानाचे क्षेत्र

- हेक्टरी ६० किलो नत्र,३० किलो स्फूरद व ३० किलो पालाश वापरावे.
- यापैकी प्रति हेक्टरी फक्त ३० किलो नत्र, संपूर्ण ३० किलो स्फूरद व ३० किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उर्वरीत ३० किलो नत्र पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसानंतर जमिनीत ओलावा असतांना द्यावे.



रासायनिक खतांचा वापर

### २) काळी जमिन व मध्य ते उच्च पर्जन्यमानाचे क्षेत्र

- हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फूरद व ४० किलो पालाश वापरावे.
- प्रति हेक्टरी ४० किलो नत्र, संपूर्ण ४० किलो स्फूरद व ४० किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उर्वरीत ४० किलो नत्र पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसानंतर जमिनीत ओलावा असतांना द्यावे.

## आंतर मशागत व तण नियंत्रण

- पेरणी नंतर साधारणतः ३५ दिवसापर्यंत पिक तणमुक्त ठेवायला पाहीजे.
- प्रति एकर ४०० ग्रॅम अट्राझीन (अट्रोट्रॉफ) २५० लीटर पाण्यात मिसळून (प्रति हेक्टरी १ किलो अट्राझीन ४०० ते ५०० लीटर पाण्यात मिसळून) पेरणी झाल्यावर लगेच फवारणी करावी.
- पेरणीनंतर २० दिवसानंतर कोळपणी करून पिक तणमुक्त ठेवावे. पेरणीनंतर दोनदा (तीन व पाच आठवड्यानंतर) डवरणी करावी.



तणमुक्त पिक

## ज्वारीवरील प्रमुख किडी व नियंत्रण

### १) खोडमाशी



खोडमाशी प्रभावीत पिक

- ❖ या किडीचा प्रादुर्भाव उगवण झाल्यावर १ ते ४ आठवड्या पर्यंत आढळून येतो.
- ❖ ही किड वाढत्या शेंड्यास खाते, त्यामुळे मध्यभागी असलेले पानं सुकतात व पोंगे मरतात त्याला पोंगे मर असेही म्हणतात.

### नियंत्रण

- ❖ पावसाची सुरुवात होताच किंवा जुलैच्या पहिल्या आठवड्यापूर्वी पेरणी केल्यास या किडीपासून सुटका होऊ शकते. बियाण्याचे प्रमाण वाढते ठेवणे फायदेशीर असते (४ कीलो प्रति एकर).
- ❖ सात ते दहा दिवसांच्या रोपावर सायपरमेथ्रीन २ मीली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी केल्यास नुकसान टाळता येते.
- ❖ या शिवाय दाणेदार ३जी फ्यूराडॉन किंवा १०जी फोरेट पेरणीसोबत किंवा पेरणीपूर्वी ८ किलो प्रति एकर ह्या प्रमाणात मातीत मिसळल्यास ही किड नियंत्रणात येते.

### २)खोड किडा




खोड किडीचा प्रादुर्भाव

- ❖ या किडीचा प्रादुर्भाव उगवण झाल्यावर दुसऱ्या आठवड्यापासून तर पिक परिवक्व होईपर्यंत आढळतो.
- ❖ सुरवातीस अळ्या कोवळ्या पाणांच्या वरच्या बाजूस खातात परिणामी ओळीने दिसणारी छीद्रे व दांड्यांचा   आतील भाग पोखरल्याचे ओरखडे दिसून येतात.
- ❖ कोवळ्या झाडांवर लवकर प्रादुर्भाव झाल्यास पोंगा मरण्याची लक्षणे दिसून येतात.
- ❖ अळ्या दांड्यांच्या आत शिरतात व खोड पूर्णपणे पोखरतात. याचा परिणाम कणासांवर होऊन कणसे तुटतात किंवा अर्धवट अथवा पूर्णपणे सुकतात.

### नियंत्रण

- ❖ या किडीचा एक हंगामापासून दुसच्या हंगामापर्यंत प्रसार होतो. हे टाळण्यासाठी पिक कापणीनंतर शेतातील धसकटे व अवशेष उपटून काढावे व जाळून नष्ट करावे
- ❖ कार्बोफ्युरॅान ३ जी किंवा फ्युराडॉन ३ जी किटकनाशक ४ ते ५ किलो प्रति एकर ह्या प्रमाणात उगवणीनंतर २० ते ३५ दिवसांनी प्रत्येक झाडांच्या पोंग्यामध्ये टाकावे.

## ज्वारीवरील प्रमुख रोग व नियंत्रण

### १) दाण्यावरील बुरशी

❖ बुरशींच्या प्रादुर्भावामुळे दाणे हलक्या भुरकट अथवा गुलाबी तर कधी काळ्या रंगाची होतात. बुरशीच्या प्रकारावर त्याचा रंग अवलंबून असतो.

❖ बुरशीमुळे दाण्यांचा रंग खराब होतो. दाण्याची उगवण क्षमता, पोषकता कमी होते, दाण्याचे वजन व आकार कमी होत जाऊन वजन घटते व बाजारभाव फार कमी मिळतो.



बुरशीग्रस्त कणीस

### नियंत्रण

❖ दाण्यांची शारीरिक परिपक्वता झाल्याबरोबर पिकाच्या कापणीस विलंब करु नये.

❖ पर्जन्यमानाच्या काळात परिपक्व होणाऱ्या वाणांची लागवड टाळणे

❖ टिल्ट २५ टक्के प्रवाही ३ मीली १ लिटर पाण्यात मिसळून पिक फुलोयावर असतांना (कणीसया निसवण्याच्या वेळी) पहीली फवारणी व नंतर १० दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी कणसांवर केल्यास बुरशीचे नियंत्रण करता येते.

ҧ कॅप्टन (०.३०%)+ डायथेन एम ४५ (०.३%) यांची कणीस निसवण्यास सुरुवात झाल्यापासून प्रत्येकी १० दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या केल्यास दाण्यांवरील बुरशीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणता येतो.

## कापणी व मळणी

❖ परेणी नंतर साधारणतः १२० दिवासानंतर कणसातील दाणे काढून त्यावर एक कडेला काळा डाग आल्याची खात्री  करून ध्यावी, काळा डाग दाण्यावर दिसल्यास पिकाची शारीरीक पक्वता झाल्याचे समजावे व ताबडतोब कापणी करावी, जेणे करून ज्वारी पावसामध्ये न सापडता बुरशीमुळे खराब होणार नाही.



यंत्राद्वारे ज्वारीची मळणी

## साठवण

❖ काळ्या रंगाच्या प्लास्टीक ताडपत्रीवर ज्वारी पसरवून त्यावर पांढ-या रंगाच्या प्लास्टीक ताड पत्रीने झाकुन उन्हामध्ये कडक वाळवावी कि जेणे करून ज्वारीमध्ये १० ते १२ टक्के ओलावा शिल्लक राहील. त्यानंतर ज्वारी लोखंडी कणगीमध्ये साठवून ठेवावी.



ज्वारी + तुर (२:१)

## आंतरपीके आणि पिकचक्र

❖ मध्यम कालावधीत येणाऱ्या सी एस एच १६ व सी एस एच २५ हया ज्वारीच्या वाणांसोबत तुर पिकाची २:१ किंवा सोयबीन पिकाची ३:६ प्रमाणात लागवड फायदेशीर असते व जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

❖ ज्वारी + चवळी पिकांची लागवड (२:२ ओळी) या प्रमाणात केल्यास, तण नियंत्रीत होऊन जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

❖ ज्वारी आधारीत पिक चक्रामध्ये म्हणजे कोरडवाहू रबी मध्ये हरबरा, करडई किंवा मोहरीचे पिक घेणे फायदेशीर ठरते.



ज्वारी + सोयबीन (३:६)

# ज्वारीच्या धान्यापासुन बनविलेले मुल्यवर्धीत पदार्थ



बिस्किट




शेवळ्या




पोहे




पास्ता



इडली



दोसा

# खादय पदार्थ तयार करणारे यंत्र



बिस्किट



शेवळ्या






भाकर



पोहे

भा.कृ.अनु.प.
ICAR

हर कदम, हर डगर
किसानों का हमसफर
भारतीय कृषि अनुसंधान परिषद

Agrisearch with a human touch






